# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(सायंकाळ)

---

**दिनांक १९.०९.२०२६ शनिवार**

**१) मा. न्यायालयातुन आरोपीला सश्रम कारावासाची शिक्षा :—**

दिनांक १९.०९.२०२६ रोजी मा. जिल्हा न्यायाधीश—१९ तथा अति. सत्र न्यायाधिश, नागपुर, श्री विनय व्ही. मुगलीकर साहेब यांनी त्यांचे कोर्टाचे विशेष केस क्र. ३२६/२०२४ मधील, पोलीस ठाणे तहसील येथील अप. क्र. २७२/२०२४ कलम ३०२,३२३,५०४,५०६ भा.दं.वि. या गुन्ह्यातील आरोपी दिलीप सुरेश गोखे वय ५३ वर्षे रा. माता मंदीर जवळ, बळीराम नाईक आखाडा समोर, टिमकी, तहसील नागपूर याचेविरूध्द साक्षी पुराव्याअंती गुन्हा शाबीत झाल्याने, **आरोपीस कलम ३०२ भा.दं.वि. कायद्यान्वये आजीवन कारावासाची शिक्षा व १०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०६ महिने अतिरीक्त कारावासाची शिक्षा, तसेच कलम ३२३ भा.दं. वि. कायद्यान्वये ०१ वर्ष सश्रम कारावास तसेच कलम ५०६ भादंवि अन्वये ०२ वर्ष सश्रम कारावासची शिक्षा ठोठावली.**

यातील आरोपी हा दारु पिण्याचे सवईचा असुन नेहमी घरी दारु पिऊन शिवीगाळ करीत होता. दिनांक २८.०४.२०२४ चे २०.१५ वा चे सुमारास, पोलीस ठाणे तहसील हद्दीत राहणाऱ्या फिर्यादी सौ. कांताबाई सुरेश गोखे हया घरी असतांना, यातील आरोपी मुलगा याने फिर्यादीस व त्यांचे पतीस शिवीगाळ करुन हातबुक्कीने मारहाण केली व घराबाहेर निघुन गेला. फिर्यादीचा लहान मुलगा गौरव गोखे हा घरी आला असता, त्यास घटनेबाबत माहिती झाल्याने, आरोपी घरी आला असता, त्याने त्यास आईवडीलांना मारणे शोभते का असे म्हटले असता, आरोपीने तु मध्ये पडु नको, असे म्हणून सोनपापडी कापण्याचे सुरीने गौरवचे गळयावर वार करुन त्यास जिवानिशी ठार केले. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे तहसील येथे आरोपीविरूध्द गुन्हा नोंदविण्यात आला होता. आरोपीला दिनांक २९.०४.२०२४ रोजी अटक करण्यात आली होती.

गुन्ह्याचे तत्कालीन तपासी अधिकारी पोनि. प्रकाश राऊत यांनी मा. कोर्टात तपासाअंती दोषारोपपत्र सादर केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड. श्री गिरीश दुबे यांनी तर, आरोपीतर्फे ॲड. श्री. ऋषीकेश ढाले यांनी काम पाहिले. सदर गुन्ह्यात कोर्ट पैरवी अधिकारी सफौ. अब्दुल कयुम यांनी काम पाहिले

**२) अंमली पदार्थ विरोधी कायद्यासंबंधाने कार्यशाळा संपन्न :**

आज दिनांक १९.०९.२०२६ चे ११.०० वा. ते १५.०० वा. चे दरम्यान, पोलीस भवन येथील ऑडोटोरीयम येथे एनडीपीएस कायदा अंतर्गत करण्यात येणाऱ्या कार्यवाही संबंधाने सखोल व कायदेशीर मार्गदर्शन पोलीस अधिकारी व अंमलदार यांना प्राप्त व्हावे या उद्येशाने मा. श्री राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), नागपूर शहर यांचे अध्यक्षतेखाली मा. श्री विनोद हुकरे, सरकारी अभियोक्ता, विशेष न्यायालय, एनडीपीएस कोर्ट, श्री स्वप्निल अलोणे, विधी अधिकारी व एनडीपीएस कायदा तज्ञ यांचे प्रमुख उपस्थितीत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेमध्ये पोलीस आयुक्तालय, नागपूर शहर व एएनटिएफ येथील अधिकारी व अंमलदार यांना अंमली पदार्थांची संपुर्ण माहिती, धाड टाकण्याचे अधिकार, झडती घेण्याचे अधिकार, फिर्याद, जप्ती, सॅम्पल, इन्व्हेंटरी, पुरावे, दोषारोपपत्र, पिट एनडीपीएस इत्यादी विषयांवर अध्यक्ष तसेच

तज्ञांनी सविस्तर मार्गदर्शन करुन अधिकारी व अंमलदार यांना येणाऱ्या अडीअडचणीवर उपाययोजना सांगुन निराकरण केले.

कार्यशाळेस नागपूर शहर पोलीस ठाणे येथील एकूण ३५ तपासी अधिकारी, व लेखनिक अंमलदार, मुद्येमाल मोहर्रर मोठया संख्येने हजर होते.





**(कामगिरी)**

**<u>गुन्हेशाखा पोलीसांची दारूबंदी, जुगार, अंमली पदार्थ/प्रतिबंधीत तंबाखु तसेच भारतीय शस्त्र कायदा अंतर्गत धडक मोहीम :—</u>**

मा. पोलीस आयुक्त, नागपुर शहर, मा. सह पोलीस आयुक्त, नागपुर शहर, मा. अपर पोलीस आयुक्त, (गुन्हे), मा. पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनात, गुन्हेशाखा पोलीसांनी नागपुर शहर अंतर्गत सर्व पोलीस ठाणे हद्दीत कायदा व सुव्यवस्थेचे दृष्टीने तसेच, गुन्हेगारांवर वचक बसावा याकरीता दिनांक १७.०९.२०२६ ते दिनांक १८.०९.२०२६ चे दरम्यान, दोन दिवसीय विशेष मोहीमेअंतर्गत अवैध दारू/अंमली पदार्थ/शस्त्रे बाळगणारे वा विक्री करणारे ईसमांवर कारवाई करून, मोठ्या प्रमाणात मुद्देमाल जप्त करून, आरोपींवर कायदेशीर कारवाई केली व त्यांचेविरोधात गुन्हे दाखल केले आहेत.

गुन्हेशाखा पोलीसांनी विशेष मोहीमेदरम्यान नागपुर शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत सर्व पोलीस ठाणे हद्दीत १) महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये ०६ केसेसमध्ये एकुण ०६ इसमांवर कारवाई करून रू. १६,२८०/— चा मुद्देमाल जप्त केला. २) एन.डी.पी.एस. कायद्यान्वये अंमली पदार्थ संबंधीत ०४ केसेसमध्ये कारवाई करुन गुन्हे दाखल केले व एकुण ०५ आरोपींना अटक करुन, त्यांचे ताब्यातुन एकुण १३,७८,०४०/—रू. चा मुद्येमाल जप्त केला. ३) महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये ०७ केसेसमध्ये एकुण ११ इसमांवर कारवाई करून रू. २,६२,२९०/— चा मुद्देमाल जप्त केला. ४) शासन प्रतीबंधीत गुटखा व तंबाखु कायद्यान्वये ०२ कारवाई करुन एकुण ०२ आरोपींना अटक करुन, त्यांचे ताब्यातुन एकुण १३,९३६/—रू. चा मुद्येमाल जप्त केला. ५) हद्दपार ईसमाविरूध्द म.पो.का. व भारतीय शस्त्र अधिनियम अंतर्गत ०१ केसमध्ये ०१ इसमांवर कारवाई करून आरोपींचे ताब्यातुन शस्त्र जप्त केले आहे. ६) पोलीस ठाणे भांडेवाडी हद्दीतील दुखापतीचे गुन्ह्याचे तात्काळ दखल घेवुन, जखमीला वैद्यकीय उपचारकामी रवाना करून, दोन संशयीतांना पकडुन भांडेवाडी पोलीसांचे ताब्यात दिले. अशा एकुण २० कारवाई करून, त्यामध्ये एकुण १६,७१,०४६/—रू. चा मुद्देमाल जप्त केलेला आहे. नागपुर शहरातील अवैध धंद्यावर प्रभावी नियंत्रण ठेवण्याकरीता गुन्हेशाखेकडुन सातत्याने कठोर व प्रभावी कारवाई करण्यात येत आहे. एनडीपिएस कायद्यान्वये दाखल गुन्ह्यातील आरोपींमागील नेटवर्क व अंमली पदार्थ वितरण साखळीबाबत सखोल तपास सुरू असुन, यापुढेही सतत कारवाई करून, विशेष मोहीम सुरू राहणार आहेत.

(गुन्हे)

**१) पोलीस ठाणे यशोधरानगर :—शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक १९.०९.२०२६ चे ००.३० वा. चे सुमारास, यशोधरानगर पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना पोलीस ठाणे हद्यीत बिरसा मुंडा पुतळयाजवळ, संजय गांधी नगर येथे एक इसम संशयास्पद स्थितीत दिसून आला. त्याचेजवळ जात असतांना, तो पोलीसांना पाहून पळून जात असतांना, त्याचा पाढलाग करुन त्यास ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव ऋषिकेश विजय गजभिये वय ३० वर्षे, रा. बाबा बुध्द नगर, वैशाली नगर, आशाबाई मडकेच्या घराजवळ, पाचपावली, नागपूर असे सांगीतले. पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे ताब्यात एक लोखंडी धारदार चाकु कि. ५००/—रू. .चा मिळून आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने धारदार लोखंडी चाकु बाळगुन समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, फिर्यादी पोअं. रितेश दुधे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे यशोधरानगर येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का. सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे हुडकेश्वर :— फसवणुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी श्रीमती दिव्यांशा सिताराम मिना वय ४० वर्षे रा. अंबाझरी ऑर्डनन्स फॅक्ट्री वसाहत, वाडी नागपूर हया कॅनरा बॅक, हुडकेश्वर शाखा येथे बॅक मॅनेजर पदावर कार्यरत आहेत. ग्राहकांनी बॅकेंत येऊन एटीएम मधुन पैसे निघत नसल्याची तक्रार दिल्याने, फिर्यादी यांनी स्टाफसह त्यांचे बॅकेचे शाखेतील एटीएमची पाहणी केली असता, सीसीटिव्ही फुटेजमध्ये अज्ञात दोन इसम यांनी एटीएमच्या कॅश डिस्पेन्सर, जेथुन पैसे बाहेर पडतात, त्याठिकाणी प्लास्टीक पट्टीचा उपयोग करुन नंतर दोन इसम पट्टी बाहेर काढून रक्कम चोरी करीत असल्याचे दिसुन आले. दिनांक १२.०९.२०२६ चे १९.०० ते दिनांक १४.०९.२०२६ चे २०.५६ वा. चे दरम्यान, अज्ञात दोन आरोपींनी संगनमत करुन, कॅनरा बॅकेंचे एटीएम मध्ये येणाऱ्या ४१ लोकांची फसवणुक करुन एकुण १,५२,०००/— चोरुन काढून घेतले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे पोउपनि. प्रविण वाळके यांनी अज्ञात दोन आरोपीविरूध्द कलम ३०३(२),३१८(४),३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे प्रतापनगर :— हद्दपार इसमास अटक.**

दिनांक १८.०९.२०२६ चे १८.५० वा. चे सुमारास, प्रतापनगर पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, प्रज्ञाशील बुध्द विहारजवळ, कामगार कॉलनी येथे एक हद्यपार इसम फिरत आहे. अशा खात्रीशीर माहितीवरुन नमुद ठिकाणी गेले असता, तिथे प्राप्त वर्णनाचा इसम दिसुन आला. तो पोलीसांना पाहून पळण्याचे तयारीत असता, त्यास घेराव टाकून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव राहुल कृष्णा गाडेकर वय २५ वर्षे रा. गल्ली क्र. ९, संत तुकडोजी नगर, नागपूर असे सांगीतले. त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०२ यांचे हद्दपार आदेश क्र. ११/२०२४ दिनांक १२.११.२०२४ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले.

आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे प्रतापनगर

येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>१) पोलीस ठाणे सिताबर्डी</u> :—** दिनांक १८.०९.२०२६ चे १४.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीत, मानस चौक ते झिरोमाईल कडे जाणाऱ्या रोडवरील फुटपाथवर एक अनोळखी इसम वय अंदाजे ३५ वर्षे वयाचे, रंग सावळा, चेहरा गोल, बांधा सडपातळ, उंची अंदाजे ५ फुट ६ इंच, डोक्याचे केस काळे, मिशी काळी, दाढी तुरळक व काळी, अंगात पांढऱ्या रंगाचे ज्यावर कत्थ्या रंगाचे लाईनिंगचे शर्ट व काळ्या रंगाचा फुलपॅन्ट घातलेल्या वर्णनाचे बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, पोलीसांनी त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप झालेली नाही. नमुद मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे सिताबर्डी येथे संपर्क साधावा.

यापकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे सिताबर्डी येथे पोउपनि. देवानंद बगमारे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे वाठोडा</u> :—** दिनांक १७.०९.२०२६ चे १३.०० वा. ते १४.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे वाठोडा हद्दीत, आराधना नगर, सातपुडा बियर बारचे मागे त्यांची मुलगी श्रीमती वर्षा चौधरी यांचेकडे हल्ली मुक्कामी असणाऱ्या श्रीमती नर्मदाबाई गुलाबराव धांडे वय ८४ वर्ष रा. दर्शन कॉलनी, न्यु नंदनवन, नागपूर हया मुलीचे घरात दिवाणवर बसुन ऑक्सिजन मशिनने ऑक्सिजन घेत असतांना, मशिन गरम झाल्याने मशिनचा स्फोट होऊन लागलैल्या आगीमध्ये नर्मदाबाई धांडे हया जळाल्याने त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पिटल, वार्ड क्र. ५१ येथे दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान दिनांक १८.०९.२०२६ चे २१.१५ वा. डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

यापकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरुन पोलीस ठाणे वाठोडा येथे मपोउपनि पुजा शेळके ७४१४९४९६२६ यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरु आहे.

**(ईतर)**

**<u>आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—</u>**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. जिल्हा न्यायाधिश —११ तथा अति. सत्र न्यायाधीश, नागपुर. | ५३/२०२१ | कलम ३५४, ३७६,१०९ भा.दं.वि. सहकलम ३(४),६ ड्रग्ज ॲक्ट | रवि गरीब साव वय २२ वर्षे, रा. गजानन मंदीरमागे, वार्ड क्र. १, चिचोली, खापरखेडा, ता. सावनेर जि. नागपुर. | १४.१०.२०२६ |
| २. | मा. तदर्थ जिल्हा न्यायाधिश—२ तथा अति. सत्र न्यायाधीश, | ७०२/ २०२५ | कलम ३५३, ३३२ भा.दं.वि. | दिलीप मोतीलाल प्रसाद वय २० वर्षे रा. वलनी कॉलनी, क्वॉर्टर क्र. २५४, खापरखेडा | १२.१०.२०२६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | नागपुर. | | | ता. सावनेर जि. नागपुर. | |

स्वा/—

( नितीन चुलपार )

सहा.पोलीस निरीक्षक,

पोलीस जनसंपर्क अधिकारी,

नागपुर शहर.